# 'आविष्कार' स्पर्धेत 'जलयुक्त शिवार' प्रथम

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात झालेल्या १४ व्या आविष्कार संशोधन स्पर्धेत इचलकरंजीच्या डी. के. ए. एस. सी. कॉलेजच्या प्रा. सुनील भोसले यांच्या जलयुक्त शिवार अभियान या संशोधन प्रकल्पाने प्राध्यापक गटातून सलग चौथ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावला. मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जलयुक्त शिवार अभियान संशोधन प्रकल्पाची निवड झाली आहे.

या संशोधन प्रकल्पामध्ये शाहुवाडी तालुक्यातील पिशवी खोऱ्यातील सोनवडे, परखंदळे, शित्तूर तर्फ मलकापूर व पिशवी या चार गावांमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत राबवण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेचा भौगोलिक दृष्टिकोनातून सूक्ष्म अभ्यास करण्यात आला आहे. जलयुक्त शिवार योजनेमार्फत चार गावांमध्ये सुमारे ५ कोटी २८ लाख रुपयांची पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाची कामे २०१५-१६ मध्ये पूर्ण करण्यात आली. मात्र या गावांना आजही मार्च ते मे महिन्यात पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे निष्कर्ष संशोधन प्रकल्पातून मांडले आहेत. संशोधन प्रकल्पास विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, कार्याध्यक्ष अभयकुमार सांळुखे, प्राचार्य आर. आर. कुंभार, आविष्कार समन्वयक पी. एस. तपासे, डॉ. पी. बी. अचोले, डॉ. डी. सी. कांबळे व हितेंद्र सांळुखे यांचे मार्गदर्शन लाभले.



आविष्कार महोत्सवात प्रा. सुनील भोसले यांनी पुरस्कार स्वीकारला.

# शाश्वत विकासामध्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व : ॲड. पाटील

## कॉमर्स कॉलेज आंतरराष्ट्रीय परिषद समारोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सर्वच क्षेत्रांमध्ये शाश्वत विकास साधायचा असेल तर शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. सर्व घटकांनी त्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव ॲड. व्ही. एन. पाटील यांनी केले.

कॉमर्स कॉलेजच्या वतीने विद्यापीठात आयोजित 'शाश्वत विकास समोरील जागतिक आव्हाने' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. ते म्हणाले, आंतरराष्ट्रीय परिषदेत दोन दिवस वेगवेगळ्या विचारवंतांनी विचार मांडून जागतिक शाश्वत विकासासाठी मार्ग दाखवला आहे. सर्वांनी एकत्र येऊन मार्गक्रमण केल्यास शाश्वत विकास साधला जाईल.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात डॉ. एस. ओ. हलास्की यांनी 'ग्रीन बँकिंग' विषयावर, तर दुपारच्या सत्रात डॉ. नंदकुमार मॅस्कॉट यांनी 'ग्रीन मार्केटिंग' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापकांनी संशोधन पेपर सादर केले. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, आर. एन. गोडबोले अध्यासनाचे प्रमुख डॉ. एस. एस. महाजन उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. ताहीर झारी यांनी केले. डॉ. बी. जे. नेर्लेकर यांनी आभार मानले.

# साहित्यिकाच्या सर्जनातून वास्तवाची जाणीव

## ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे यांचे गौरवोद्गार

कोल्हापूर / प्रतिनिधी :

साहित्यिक त्याच्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून आभासी दुनियेच्या पलीकडल्या वास्तवाची जाणीव वाचकाला करून देत असतो. जुगाड आणि श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता या दोन्ही साहित्यकृती त्या वास्तवाशी नाते सांगणाऱ्या आहेत, असे गौरवोद्गार ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत साजरा करण्यात येत असलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा -२०२० या कार्यक्रमाचे औचित्य साधून जुगाड (द्वितीय आवृत्ती) आणि श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता या पुस्तकांचा एकत्रित प्रकाशन सोहळा शुक्रवारी भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृहात झाला, त्यावेळी सप्रे बोलत होते.

सप्रे म्हणाले, जुगाड या ग्रंथामधून सामाजिक सद्यःस्थितीची जाणीव होते. काही काळ मनाला स्तब्ध, अस्वस्थ करणारी ही कलाकृती आहे. श्वासोच्छ्वासांच्या मध्यंतरातील कविता हीसुद्धा वाचकाला त्याच्या मुळाशी जोडून ठेवत असतानाच



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये पुस्तक प्रकाशनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

जीवनाच्या विविध टप्प्यांवर अनुभवास येणाऱ्या सामाजिक, मानसिक आंदोलनांची जाणीव करून देते. प्राचार्य आण्णासाहेब खेमणार म्हणाले, माणसाकडे साहित्यरूपी वेड, आवड आणि सामाजिक भान असल्यास दर्जेदार साहित्याची निर्मिती होत असते. नव्या पिढीला निश्चितपणे प्रेरणा देणारी आणि साहित्यिक भरण-पोषण करणारे कार्य या दोन्ही पुस्तकांमुळे होणार आहे.

डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, मराठी साहित्य लेखनासाठी कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या शाखेची आवश्यकता नसते. अनेक मोठे साहित्यिक या परिसरामधील आहेत, हे कोल्हापूरचे वैभव आहे. अतिशय संवेदनशीलपणे मांडणी करणारे आणि साक्षेपी वेध घेणारे कादंबरीकार निर्माण होत आहेत, हे चांगले द्योतक आहे. यावेळी कादंबरीकार किरण गुरव आणि कवी डॉ. रघुनाथ कडाकणे आणि गौरावती खराडे यांनी मनोगत व्यक्त केले.

सुरुवातीला किरण गुरव यांच्या जुगाड द्वितीय अवृत्तीचे आणि डॉ. रघुनाथ कडाकणे यांच्या श्वासोच्छ्वासांच्या मध्यंतरातील कविता या ग्रंथांचे प्रकाशन झाले. प्रास्ताविक व परिचय डॉ. नंदकुमार मोरे यांनी केला, तर आभार राजेश पाटील यांनी मानले. घोडावत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बी. एम. हिर्डेकर, विद्यार्थी, प्राध्यापक आणि साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# सत्तेच्या नव्हे तर सत्याच्या बाजूने राहा : वैभव नायकवडी

कोल्हापूर, ता. ११ : राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी चळवळीत भाग घेणे अत्यावश्यक आहे. सत्य बोलणाऱ्यांची आज गरज आहे. आपण सत्तेच्या नव्हे तर सत्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे, असे आवाहन हुतात्मा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वैभव नायकवडी यांनी केले. राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेच्या अधिवेशनाचा समारोप समारंभ शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन सभागृहात झाला. यामध्ये नायकवडी बोलत होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. सिकंदर जमादार यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागामध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय परिषदेचा समारोप शनिवारी झाला. समारोपात वैभव नायकवडी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. बी. बी. पाटील, डॉ. भालबा विभूते, प्रा. डॉ. प्रमोद पवार, डॉ. विलास आवारी यांच्यासह मान्यवर.**

नायकवडी म्हणाले, ''आज राज्यासमोर व राष्ट्रासमोर अनेक समस्या आहेत. या समस्यांचा प्रत्येक भारतीय नागरिकांवर होणार परिणाम याचा वर्तमान राजकारणाशी जवळचा संबंध आहे. माझ्या विद्यार्थी चळवळीची सुरुवात राज्यशास्त्र विभागातून झाली. आज तरुणांनी चळवळीत सहभाग घेणे काळाची गरज आहे. आज सत्य बोलण्याची गरज आहे. आपण सत्तेच्या नव्हेतर सत्याच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. राज्यशास्त्रचा अभ्यासक कायमच विद्यार्थी असतो. आपण वर्तमानाला सत्याच्या कसोटीवर तपासून पाहिले पाहिजे.''

विभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.

डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. बी. बी. पाटील, डॉ. भालबा विभुते, प्राचार्य डॉ. प्रमोद पवार, डॉ. विलास आवारी, प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे, डॉ. काशीकर, डॉ. भारती पाटील यांची उपस्थिती होती.

**अध्यक्षपदी डॉ. भणगे**

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३८ वे अधिवेशन औरंगाबादमधील जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात होणार आहे. या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांची निवड केली.

# विद्यापीठात नवनिर्मितीचा ‘आविष्कार’

## विविध वैज्ञानिक प्रकल्प : ७५ प्रकल्प, १९७ पोस्टरचा समावेश

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : शेतामध्ये सौर ऊर्जेतून वीज निर्मिती, सायकलवरील हात पंप, गायीच्या दुधापासूनचे पदार्थ, वणव्याच्या धोक्यापासून जंगलाचे संरक्षण अशा नानाविध प्रकल्पांचे सादरीकरण आविष्कार महोत्सवात करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात आविष्कार महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. यामध्ये ७५ प्रकल्प आणि १९७ पोस्टर लावले होते.

आविष्कार महोत्सवाचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, ''आविष्कार एखाद्या देशाच्या यशासाठी महत्त्वपूर्ण आहे. मर्यादित स्रोतांमधून अधिकाधिक लोकांना परिपूर्ण सेवासुविधा पुरवण्यात सक्षम असलेल्या नवकल्पना आणि मानवी विकास याकडे देशाचे लक्ष्य केंद्रित करणे आवश्यक आहे.'' डिपार्टमेंट ऑफ टेक्नोलॉजीचे संचालक डॉ. जयदीप बागी म्हणाले, ''काईझेन या जपानीस तत्वज्ञानाप्रमाणे सतत सुधारणा व याकरिता आवश्यक असणारे बदल अंगीकारणे महत्त्वाचे आहे.''




**कोल्हापूर : आविष्कार महोत्सवाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत जयदीप बागी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

महोत्सवात कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हानिहाय तसेच विद्यापीठांतर्गत झालेल्या आविष्कार महोत्सवातील प्रत्येक गटामधून निवडलेल्या तीन विजेत्यांना त्यांचे संशोधन प्रदर्शित करण्याची संधी देण्यात आली. महोत्सवात पोस्टर प्रदर्शन तसेच प्रकल्पांच्या प्रतिकृती असे विद्यार्थी व संशोधकांनी संशोधन सादर केले. यामध्ये उद्योजकता कौशल्य विकासचा अभ्यास, तुळशीपासून आयुर्वेदिक आईस्क्रीम, इंटरनेटचा वापर आणि नैराश्य, पाम तेलापासून बायो-फ्युएल, ग्रामीण भागाकरिता सौरऊर्जेवर चालणारी सिंचन व्यवस्था, वणव्याचा धोका असणाऱ्या वनक्षेत्राचे सर्वेक्षण, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांची भावनिक बुद्धिमत्ता विकास कार्यक्रमाचा अभ्यास अशा अनेकविध प्रकारचे संशोधन प्रदर्शित केले गेले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महोत्सवाचे समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक, संयोजक डॉ. एस. बी. सादळे आदी उपस्थित होते.